संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लष्कराच्या नावावर भाकऱ्या भाजण्याचे काम

**लष्कराच्या** सैन्य भरतीचे पेपर फुटल्याप्रकरणी अटक झालेल्यांची संख्या २९ वर पोहचली आहे. याचा अर्थ या कारस्थानाचे धागेदोरे राज्यभर पसरलेले दिसतात आणि तो काही यावर्षीच घडलेला प्रकार वाटत नाही. छुप्या पध्दतीने सैन्य भरतीचे पेपर काही ठरावीक लोकांना उपलब्ध करून दिले जात असावेत, असा अंदाज त्यावरून बांधता येतो. काही माजी सैनिक आणि एका प्रशिक्षण संस्थेच्या संचालकालाही याप्रकरणी अटक झालेली आहे. पेपरफुटीची माहिती बाहेर आली, याचा दुसरा अर्थ असा होतो की, ज्या मोबदल्यामध्ये पेपर दिले जात होते, तो मोबदला या कारस्थानातल्या सर्वांपर्यंत नीट पोहचलेला दिसत नाही. आतापर्यंत इतर अनेक परीक्षांबाबत पेपरफुटीची प्रकरणे होऊन गेली आहेत. लोकसेवा आयोगापासून ते शालांत माध्यमिक परीक्षांपर्यंत असे प्रकार केव्हा ना केव्हा तरी घडतच असतात. त्यातही सरकारतर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका या विशिष्ट वर्गापर्यंत व्यवस्थितपणे पोहचवल्या जातात. त्याची एक साखळी ठरलेली आहे. आता हे लोण लष्करापर्यंत पोहचले, हा त्यातला सर्वात धक्कादायक भाग ठरतो. शिस्त, अनुशासन किंवा परीक्षेतला कठोरपणा याबाबतीत लष्कराचा कोणीही हात धरू शकत नाही, असा आतापर्यंत नावलौकिक होता. त्याला या घटनेने बट्टा लागला आहे. विशेष म्हणजे या सगळ्या कटकारस्थानांना सैन्य दलातून निवृत्त झालेल्या काही माजी सैनिकांनी हातभार लावावा आणि याचे धागेदोरे नाशिक-पुण्यापर्यंत जाऊन पोहचावेत. यामध्ये लष्करातल्या छुप्या बेदिलीची कल्पना येते. सैन्य भरतीसाठी मोठ्याप्रमाणावर तरुण उत्सुकतेने येत असतात. कमी शिक्षण, घरची वाईट अर्थस्थिती आणि रोजगाराची अत्यंत निकड या तीन कारणांमुळे लष्करात नोकरी मिळणे म्हणजे आपल्या भाकरीची सोय होणे, असा विचार करून देशभरातून लाखो तरुण स्वतःची भरती करून घेत असतात, ही वस्तुस्थिती आहे. आपल्या स्वार्थापलीकडचे काम असले की, लष्कराच्या भाकऱ्या कोण भाजणार असा वाक्प्रचार वापरण्याचा प्रघात आपण पाहात असतो. परंतु, इथे लष्कराच्या भाकऱ्या मिळवण्यासाठी आणि लष्कराच्या नावावर भाकऱ्या शेकवण्याचा प्रकार सर्रासपणे झालेला दिसून येतो. भारतीय सैन्य त्याचा एकूण नावलौकिक, देशवासीयांना त्याविषयी वाटणारा अभिमान या सगळ्या गोष्टींचा एकत्रितपणे विचार केला, तर पेपरफुटीचा हा ताजा प्रकार लष्कराची अवहेलनाच नव्हे तर मानभंग करणारा ठरतो.

### व्यवस्थेला पोखरणारे काम

लष्कराच्या बाबतीत भ्रष्टाचार हा प्रकारही गेल्या काही वर्षात मोठ्याप्रमाणावर ऐकू येऊ लागला आहे. केंद्रीय अंदाजपत्रकामध्ये संरक्षणासाठी जी आर्थिक तरतूद केली जाते, तो खर्च कसा झाला याचा हिशेब विचारण्याची नियमानुसारच सोय नाही. देशाच्या संरक्षणासाठी केला जाणारा खर्च हा कोणाच्याही टीकेचा किंवा वादाचा विषय होऊ नये, याचा गैरफायदा शत्रूराष्ट्राला मिळू शकतो, असा उद्देश ठेवून संरक्षणविषयक खर्च केला जात असतो. परंतु, बोफोर्स तोफांपासून ते पाणबुडी खरेदीपर्यंत किंवा अलीकडेच हेलिकॉप्टरच्या खरेदीतही लाच खाल्ली गेल्याचा आरोप झाला. त्याची चौकशी सुरू झाली आणि चक्क माजी हवाईदल प्रमुखावर त्याचा ठपका आला. याचा अर्थ भ्रष्टाचारही देशाच्या तीनही दलांच्या व्यवस्थापनांमध्ये पसरलेला पाहायला मिळतो. मात्र अजूनही या तीनही दलांच्या शिस्तीबाबत बऱ्यापैकी नावलौकिक टिकला आहे. तो एकूणच देशाच्या सुरक्षा व्यवस्थेचा संवेदनशील मुद्दा ठरतो. सैन्य भरती असो किंवा तीनही दलांसाठी देशभरात विविध ठिकाणी चालणारी लष्करी महाविद्यालये असो. तिथे शिस्तीला विशेष महत्त्व दिले जाते. म्हणूनच आतापर्यंत कधीही लष्करातर्फे केल्या जाणाऱ्या सैन्य भरतीत काय किंवा चालवल्या जाणाऱ्या महाविद्यालयांमध्ये काय, शैक्षणिक पातळीवर पेपरफुटीसारखा गैरप्रकार झाला नव्हता. यावेळी मात्र तो प्रथमच घडलेला आहे. या सगळ्या प्रकरणाची अतिशय गंभीरतेने दखल घेतली पाहिजे. कारण ही कीड जर का जास्त पसरत गेली, तर ती लष्कराच्या अन्य भागांनाही पोखरून काढू शकेल. कारण आपण दिलेली परीक्षा ही पेपर विकत घेऊन दिलेली आहे आणि लष्करामध्येसुध्दा हेच प्रकार चालतात, अशी समजूत मनामध्ये ठेवून जर सैन्य भरती होऊ लागली तर असे सैनिक केव्हा आणि कसे फितूर होतील, याचा कोणताही नेम राहणार नाही. याकरिता अगदी प्राथमिक पातळीवर सैन्य भरतीच्या एका चांगल्या व्यवस्थेला धक्का पोहचवणाऱ्या या फितुरांना कायमचे जेरबंद केले पाहिजे.

### पोलीस भरतीतही तेच

देशाच्या विविध राज्यांमध्ये स्थानिक पातळीवर होणाऱ्या पोलीस भरतीविषयी नेहमीच तक्रारी ऐकू येतात. थेट पेपरफुटीसारखे प्रकरण जरी घडत नसले, तरी राजकारण्यांच्या चिठ्ठ्या चपाट्या किंवा विविध प्रकारचे दबावतंत्र वापरून आपल्या सोयीच्या उमेदवारांची भरती पोलीस दलात होत राहते. अगदी पोलीस उपनिरीक्षकाच्या परीक्षांबाबत महाराष्ट्रातसुध्दा हमखासपणे झालेले आहेत. बिहार उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, पंजाब याठिकाणी तर उपनिरीक्षक नियुक्तीबाबतचे भ्रष्टाचाराचे दरही ठरलेले असतात. महाराष्ट्रातही असे दरपत्रक छुप्या पध्दतीने राबवले जाते आणि मग या मार्गाने पोलीस दलामध्ये सामील झालेली ही कुमक समाजाच्या सुरक्षिततेपेक्षाही स्वतःच्या सुरक्षिततेकडे जास्त लक्ष देते. पोलीस काय किंवा उपनिरीक्षक काय, त्याची नियुक्ती झाल्यानंतर पुढच्या पाच दहा वर्षात त्या व्यक्तीच्या घरासमोर गाडी उभी राहते. गावाकडे जमिनी घेतल्या जातात. हा प्रकार देशभरात सर्रासपणे बऱ्यापैकी पाहायला मिळतो. भ्रष्ट पध्दतीने सुरक्षा संस्थांमध्ये दाखल झाल्यानंतर अशा व्यक्ती संपूर्ण व्यवस्थेला सुरुंग लावत असतात. दुर्दैवाने आपल्या देशात त्याचा कठोरपणे बंदोबस्त होऊ शकत नाही. आता याच पध्दतीने सैन्यातही शिरकाव केलेला दिसतो. हे अधिक चिंताजनक ठरते. आता केवळ संबंधितांना अटक करून चालणार नाही. तर हा प्रकार कधीपासून सुरू होता आणि तो कुठपर्यंत पोहचलेला आहे, याचा मुळासकट शोध घेतला जाणे गरजेचे ठरते.